Vol 2 Issue 9 March 2013 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.in**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 9, March. 2013
ISSN:-2231-5063
Available online at www.aygrt.isrj.net

RESEARCH PAPER

GRT

# मराठा राज्यकर्त्यांची धार्मिक श्रद्धास्थाने

*अनिल माणिकराव बैसाणे*

इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

**सांराश :**

शिवपूर्वकालात महाराष्ट्रीय समाज वैदिक धर्माचा पुरस्कर्ता होता. सातवाहन, राष्ट्रकूट ह्या राजसत्ता वैदिक धर्माचा अभिमान बाळगून होत्या. स्वाभाविकच तत्कालीन समाजव्यवस्थेवर यज्ञसंस्थेचा मोठा प्रभाव होता. शक, यवनांसारख्या राजवटींनीसुद्धा हिंदूधर्माचा स्वीकार केला होता. मात्र जैन आणि बौद्ध धर्माच्या प्रसारामुळे यज्ञसंस्थेवर थोडा परिणाम झाला.

**प्रस्तावना :**

वेदोक्त व्रतांऐवजी पुराणोक्त व्रतांना महत्त्व प्राप्त झाले. इ.स.च्या ७ व्या शतकापासून महाराष्ट्रात शैव धर्माच्या प्रभावास प्रारंभ झाला. धार्मिक स्थळांना राजदरबारातून आर्थिक सहाय्य मिळू लागल्याने हिंदू धर्माची प्रियता वाढत गेली. तसेच इस्लाममधील गूढवादाचा निदर्शक असलेल्या सूफी पंथाचाही याकाळात प्रभाव होता. १३ व्या शतकामध्ये निजामुद्दीन अवालीयाने ह्या पंथांची महाराष्ट्रात सुरूवात केल्यामुळे महाराष्ट्रातील धार्मिक क्षेत्रात एक वेगळे दालन उघडले गेले.

**शिवरायांच्या धार्मिक संकल्पनेची व्यापकता :**

महाराष्ट्रात इस्लामी सत्तेच्या अमंलामुळे हिंदूची परिस्थिती भीषणच होती. भयग्रस्त आणि निस्तेज अशा हिंदू समाजाला वारकरी संप्रदायाने मार्गदर्शन केले. शिवकालात महाराष्ट्रीय समाजातील पूर्वापार चालत आलेल्या श्रद्धा आणि अंधश्रद्धा अस्तित्वात होत्या. पंढरपूरचा विठोबा, कोल्हापूरची महालक्ष्मी तसेच नासिक आणि शनिशिंगणापूर, जेजुरीसारख्या धार्मिक स्थळांना महत्त्व प्राप्त झाले होते. पौराणिक व ग्रामदेवतांच्या पूजा-अर्चा, नवस, उपासना केल्या जात. शिवराय हे सहिष्णुवृत्तीचे असल्यामुळे मंदिरांना आणि मशिदींना सरकारातून सहाय्य होत असे. असे असले तरी सहिष्णुवृत्तीची जपणुक करणाऱ्या शिवरायांनी मात्र धर्माला अधिक व्यापकता प्राप्त करून दिली. केवळ व्रतवैकल्ये, पूजन-हवन श्राद्ध म्हणजेच धर्म नव्हे तर शत्रूंचे पारिपत्य करून स्वराज्याची स्थापना म्हणजे धर्म होय. म्हणूनच शिवरायांनी राज्यकारभार करीत असता धर्माला योग्य आशय प्राप्त करून दिला.[१]

याकाळात मराठी समाजावर इस्लामी संस्कृतीचा प्रभाव होता. कारण समाज हा आपले आचार-विचार, सांस्कृतिक चालीरिती पराभूत पक्ष्यावर लादत असतो. म्हणूनच राज्यकर्ती जमात म्हणून इस्लामी बाबींचा प्रभाव हा हिंदू समाजावर पडला होता. काही बाबींचा स्वीकार तर मराठा सरदारांनी स्वेच्छेने केल्याचा आढळतो. समाजव्यवस्था काही अंशी मिश्रस्वरूपाची होती. धार्मिक जीवनात हिंदूवर मुस्लिम धार्मिक स्थळांचा आणि पीर-फकीरांचा प्रभाव असल्याचे दिसते. मालोजी राजे भोसले यांना जी दोन मुले झाली ती शहाशरीफ या मुस्लिम फकीराच्या आशीर्वादाने झाली असल्याची त्याची श्रद्धा होती म्हणूनच त्यांनी आपल्या मुलांची नावे श्शहाजीश व

शशरीफजीश अशी ठेवलीत.[२]

### *शिवनेरीवरील शिवराई देवीचे मंदिर :*

पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळील शशिवनेरीश किल्ल्यावर दक्षिणेच्या बाजुने एका लेणीमध्ये दक्षिणमुखी मंदिरात शिवाई देवीची प्रतिष्ठापना केली आहे. याच गडावर शिवरायांचा जन्म झाला. राजमाता जिजाऊंनी या देवीवरील श्रद्धेपोटी आपल्या पुत्राला शिवाजी हे नाव दिले. श्री शिवाई देवी जुन्नर परिवारात वास्तव्य असणाऱ्या आदिवासींमधील कोळी जमाती बांधवांची कुलदेवता आहे. या देवीच्या नावावरूनच या गडाला शिवनेरी असे नाव पडल्याचीही लोककथा आहे.[३]

### *रायरेश्वर (पुणे) :*

भोर तालुक्यात रायरेश्वर हे प्रसिद्ध असे प्राचीन पवित्र स्थळ आहे. शिवरायांच्या शस्वराज्याची प्रतिज्ञाश ही घटना ऐतिहासिक की काल्पनिक हा भाग जर सोडला तर एक समाजमत असलेली घटना म्हणून या बाबीकडे पाहता येते. या पवित्र ठिकाणी मित्रांसह शिवबा आले होते. येथील भौगोलिक परिस्थिती पाहिली असता या घटनेला पाठबळ मिळते की शिवरायांच्या आणि सवंगड्यांच्या स्वराज्य उभारणीच्या हालचाली येथेच घडल्यात. दादाजी प्रभूंनी सर्व पूजेची तयारी करून ठेवली. जेष्ठ सवंगडी वीर बाजी पासलकर यांनी शिवरायांना स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा रायरेश्वराच्या साक्षीने देवविली. पुढे येथील स्थळांच्या पूजेकरिता शिवा जंगमाची नियुक्ती केली होती. एकंदरीत पाहिले तर स्वराज्य स्थापनेच्या कार्यातील आद्य प्रेरणा असलेले रायरेश्वर हे महाराजांचे मोठे श्रद्धास्थान होते.[४]

### *तुळजापुरची भवानी :*

शिवरायांची तुळजापूरच्या भवानी देवीवर मोठी श्रद्धा होती. म्हणून महाराज तुळजापूरला जावून देवीची पूजा बांधीत. आजही मंदिराच्या मागील बाजूस म्हणजे पश्चिमेचा पायऱ्यांचा मार्ग शिवराय येत असल्याचा दाखविला जातो. मात्र नेहमी येवून देवीला नमन करणे शक्य होत नव्हते. देवीचे नित्य दर्शन व्हावे म्हणून महाराजांनी प्रतापगडावर तुळजाभवानीची विधीपूर्वक स्थापना केली. सलग तीन सभामंडळपांच्या पुढे गाभाऱ्यात अष्टभूजा भवानी महिषासूर मर्दिनीच्या रूपात उभी आहे. मंदिराचे बांधकाम काळ्या दगडात करण्यात आले आहे. शिवकालापासून आजही देवीची पूजा अखंडितपणे चालू आहे. हे कार्य गडावरील पुजारी वंशपरंपरेने करीत आहेत. आपल्या उपास्य देवतेची मूर्ती शिवरायांनी नेपाळमधील गंडकी नावाच्या नदीपात्रातील शिळापासून घडवून आणली आहे. या मूर्तीचे प्रथम राजगडावर असलेल्या जिजाऊंना दर्शन देवून मग प्रतापगडावर विधीवत प्राणप्रतिष्ठा करून स्थापना केली आहे. स्वराज्यावरील अफझलखानाचे संकट आले तेव्हां शिवरायांनी अफझलचे निर्दालन करून स्वराज्य राखले. भवानी ही महाराजांची मोठी प्रेरणा होती.५  तसेच गडावर बांधकाम करतांना शिवलिंग सापडले होते. तेथेच श्री. केदारेश्वराचे मंदिर उभारले आहे तसेच वेताळेश्वराचे मंदिरही पहावयास मिळते.

### *याकूब बाबांचा दर्गा – केळशी :*



केळशी येथे महालक्ष्मीच्या मंदिराच्या उजव्याबाजूने डोंगरावर जाणाऱ्या रस्त्याने १ कि.मी. अंतरावर गेल्यास 'हजरत याकूबबाबा सरवरी रहमतुल्ला दर्गा' आहे. सन १६१८ मध्ये हैदराबादहून बाणकोटमार्गे याकूबबाबा येथे येवून राहिलेत. याकूबबाबा व शिवराय भेट झाली असल्याचे उल्लेख मिळतात. महाराजांच्या दाभोळ स्वारीस बाबांनी विरोध केला होता. तरीही महाराजांनी मोहीम हाती घेतली होती, मात्र अपयश आले. पुढे बाबांच्या निर्देशानुसार स्वारी केली म्हणून महाराजांना मोठा विजय प्राप्त झाला होता. म्हणून महाराजांनी दर्गा बांधून  ५३४ एकर जमीन इनाम दिली. याकूबबाबांवरही महाराजांची मोठी श्रद्धा होती. पुढे

१६८१ मध्ये बाबांचे निधन झाले असले तरी ६ डिसेंबर दिनी मोठा ऊरूस भरतो त्याचा मान हिंदू व्यक्तीस असतो. ऊरूसमध्ये हिंदू-मुस्लिम मोठ्याप्रमाणात सहभागी होत असतात.[६]

### *रायगडावरील जगदिश्वराचे मंदिर :*

रायगडावर राजधानी नेण्याचे ठरल्यावर शिवरायांनी हिरोजी इंदूलकरांच्या मार्गदर्शनाखाली विहीरी, तळी, घरे, रस्ते, स्तंभ, गजशाळा व सुंदर राजगृहे अशी बांधकामे करवून घेतलीत. महत्त्वाचे म्हणजे गडाच्या पूर्वबाजूला जगदीश्वराचे प्रशस्त मंदिराचेही बांधकाम करवून घेतले. सदर मंदिराला चौकोनी मोठी दगडी तटबंदी असून काळ्या दगडांच्या चौथऱ्यावर घडीव दगडांचा वापर करून पूर्वमुखी मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. वर दक्षिण व उत्तर दिशेच्या म्हणजेच मंदिराच्या डाव्या व उजव्या बाजूला तीन-तीन असे लहान ६ घुमट आहेत तर मंदिराच्या गाभाऱ्याच्या वर पाकड्यांच्यामध्ये श्रीफळ प्रमाणे मोठा घुमट साकारला आहे. एकूणच मंदिराचा वरचा भाग घुमट वैगरे हे इस्लामी बांधकामाचा प्रत्यय आणून देतात. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर वर मान केलेल्या नंदीची घडीव पाषाणातील मूर्ती साकारलेली आहे. मंदिराच्या तटबंदीच्या द्वाराच्या उंबरठ्याच्या दगडावर इंदूलकरांच्या नावाचा शिलालेख असून याच दरवाजाच्या दक्षिणबाजूस जगदिश्वराचा मोठा शिलालेख आहे तसेच याच दरवाजाच्या दक्षिणबाजूस जगदिश्वराचा मोठा शिलालेख भिंतीत लावण्यात आला आहे. समोरच शिवसमाधीची सुंदर वास्तु आहे. गडावर जगदीश्वराच्या मंदिराव्यतिरिक्त मदरशाची कबर, शिरकाई मंदिराच्या वास्तु आहेत.[७]

### *तोरण्यावरील मेंगाई मंदिर :*

तोरणा गडावर बिनी दरवाज्यातून बालेकिल्ल्यावर जाता येते. बालेकिल्ल्याचा कोठी दरवाज्यातून आत येताच डाव्या बाजूच्या तटावर तोरणजाईचे मंदिर आहे. याचठिकाणी सुवर्ण मोहरांचे हंडे सापडले होते. याच मंदिरासमोर तोरणेश्वर महादेव मंदिरही आहे. येथून पुढे बालेकिल्ल्याच्या माथ्यावर जाता येते. याच माथ्यावर आपणास मेंगाई देवीचे मंदिर पाहता येते. गडावर मुक्कामाकरिता ह्याच मंदिराचा आसरा घ्यावा लागतो. या गडावर महाराजांना २२ हंडे सुवर्ण मोहरा मिळाल्याने उभे राहणाऱ्या स्वराज्याला मोठीच मदत झाली. अर्थात जेथे हे द्रव्य सापडले तेथेच महाराजांनी श्रद्धेपोटी अष्टभुजा महिषासुरमर्दिनी श्री तोरणजाईची प्रतिष्ठापना केली. माथ्यावरील मेंगाई देवीच्या मंदिरासमोर काही वीरगळ, सतीशिळा व थडी आहेत. तसेच गडावर वेताळ मंदिरही आहे.[८]

### *पुरंदर पायथ्याचे नारायण मंदिर :*

पुरंदर गडाच्या पायथ्याशी पूर नावाच्या गावात ८०० ते १०००. वर्षापूर्वीचे हेमांडपंथीय धारटणीचे तीन दालन असलेले हे मंदिर भव्य आहे. संपूर्ण मंदिर दगडी असून शिख्राचे बांधकाम मात्र विटांचे आहे. मंदिरात स्थापित शिवपिंड नसून स्वयंभू तांदळा व त्यावर पाच पिंडी आहेत. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस श्चांगा वटेश्वराचा शिष्य श्रीधर जोगीश असा शिलालेख आहे. ज्ञानेश्वरकालीन चांगदेवांशी संबंध असा निर्देश या शिलालेखातून मिळतो.

पुरंदर गडाच्या बालेकिल्ल्यात एक केदार टेकडी आहे. या टेकडीवरील जागा कमी असून ती जागा श्रीकेदारेश्वराच्या मंदिराच्या बाांधकामात वापरली गेली आहे. मंदिर साध्या बांधणीचे मात्र मजबूत आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात स्थापित लिंग असून मागील कोनाड्यामध्ये पार्वतीची मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात आली आहे. बाहेर सभामंडपात नंदीची स्थापना केली आहे. सभामंडपात दोन व्यासपीठे असून डाव्या बाजूला दिपमाळ आहे. उजव्याबाजूला नंदीजवळच एक चौथरा असून तो कदाचित समाधीचा असावा. याबरोबरच गडावर नारायण, म्हसोबा, पद्मावती, हनुमंत, गणेश आणि लक्ष्मी या देव-देवतांची मंदिरे आहेत. पुरंदरचा जोड किल्ला असलेल्या वज्रगडावर विहीरी काठावरच हनुमानाचे मंदिर आहे.[९]



### *कुकडेश्वर मंदिर :*

भीमा ते गोदावरी या दोन्ही दरम्यानच्या प्रदेशात दर सात ते आठ कि.मी.च्या अंतरावर दहा नद्या येतात. या नद्यांच्या उगमस्थानाच्या प्रदेशात शिवमंदिर आहे. भवरगिरी, वचपे, पारूंडे, कुकडेश्वर, नागेश्वर, हरिश्चंद्रेश्वर, अनंतेश्वर

तसेच टाकेद, बेलगाव, तऱ्हळे त्र्यंबकेश्वर अशी ही बारा शिवस्थाने झंझाराजाने बांधली असल्याचे सांगितले जाते. ही सर्व धार्मिक स्थळे मराठा राज्यकर्त्यांची आणि सरदारांची श्रद्धास्थाने होती.[१०]

चंदन-वंदन किल्ल्याच्या पायथ्याशी किकली गावात काळ्या दगडात सुबक असे कोरीव शिवमंदिर आहे. ह्या मंदिराकडे पाहिले तर ते दुर्लक्षित दिसते. असे असले तरी हे मंदिर पूर्ववैभव टिकवून आहे. या मंदिराची दिपमाळा आणि प्रवेशद्वार कलाकुसरीचा उत्कृष्ट नमुना आहे.[११]

### *रत्नागिरी किल्ले – श्रीभगवती मंदिर :*

रत्नागिरी शहराच्या पश्चिमेस समुद्रकिनारी रत्नदुर्ग नावाने उल्लेख होत असलेला सागरी दुर्ग आहे. बालेकिल्ल्यात उंचीवरील प्रवेशद्वारातून आत येता येते. येथे श्रीभगवती देवीचे मंदिर सुस्थितीत आहे. उलट नव्यानेच केलेल्या रंगकामामुळे हे मंदिर अलीकडचेच वाटते. नवरात्रीत या देवीचा उत्सव असतो. मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून या देवीच्या उत्सवात एक मुसलमान मानकरी सहभागी असतो. या देवीच्या नावावरून या किल्ल्याला भगवती गड असेही म्हणतात. मंदिराच्या समोरच कान्होजी आंग्रेचे स्मारक बांधण्यात आले आहे. मंदिराचे सभामंडप भव्य आहे. एक महत्त्वाचा उल्लेख येथील माहितीफलकावर वाचावयास मिळतो. तो म्हणजे सन १८५७ च्या उठावापूर्वी झाशीची राणीने येथे येवून भगवती देवीचे दर्शन घेतले होते.[१२]

### *किल्ले रोहीडा – रोहिडमल्ल :*

अवघड चढणीचा गड चढल्यावर तीन दरवाजे ओलांडल्यावर गडाच्या आतील भागात प्रवेश होतो. आत गेल्यावर डाव्या बाजूस रोहिडमल्ल (भैरोबा) चे पडक्या स्थितीतील मंदिर दिसते. हे मंदिर दगडात बांधले असून मंदिराच्या मध्यभागी एका कोनाड्यात डाव्या अंगाला गणपती, भैरव व भैरवी यांच्या मूर्ती आहेत. उजव्या बाजूला शिवपिंडी आहे. मंदिराच्या बाहेर दिपमाळ आहे. काही चौकोनी दगडी थडी आहेत. यावर कळस, शिवलिंग असे कोरीव काम दिसते.[१३]

### *सज्जनगडावरील समर्थ मठ :*

सज्जनगडावर समर्थांचा मठ, श्रीरामाचे मंदिर व त्याखाली समर्थांचे स्मारक आहे. २२ जानेवारी १६८१ मध्ये समर्थांनी देहत्याग केला. त्यानंतर संभाजी महाराज व रामचंद्र पंत अमात्य गडावर येवून गेलेत. त्यांनी सांगितल्याप्रमाणे समर्थांच्या देहावर संस्कार झालेल्या जागेवर स्मारक उभारण्यात आले आहे. भुयारात स्मारक व त्यावर श्रीराममंदिराची उभारणी करण्यात आली आहे. येथे श्रीरामाच्या समोर मारूती आणि पाठीमागे श्रीगजाननाची मूर्ती आहे. गडाच्या पायथ्याशी असलेल्या गावात श्रीकेदारेश्वर महादेव व विरूपाक्ष मंदिर अशी प्राचीन शिवालये आहेत. आज गडावर जातांना रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणच्या प्रसिद्ध मारूतीरायांची स्थापना करण्यात आली आहे. गडावरील वातावरण वेदमंत्र व पुजा पाठाने मंगलमय झालेले असते.[१४]





शिवरायांनी आरमार उभारून सागरी किल्लेही बांधून काढलीत. यामुळे पश्चिम किनाऱ्यावरून स्वराज्याचे संरक्षण झाले. या सागरी दुर्गावर मंदिराची उभारणी करून धार्मिक श्रद्धाळू वृत्ती जोपासल्याचे दिसते. अलिबागजवळ खांदेरी गडावर श्रीवेताळाचे मंदिर आहे. मंदिराचे छत लोखंडी पत्र्याचे असून मंदिरात त्रिकोणी आकाराची वेडीवाकडी परंतु मोठी शिळा आहे. तीच वेताळाची मूर्ती सांगितली जाते. आजही थळ परिसरातील लोक या वेताळास नवस बोलतात आणि बकऱ्याचा बळी देवून त्याची फेड करीत असतात. गडावर दौदपीर, गणेशमंदिर, हनुमान मंदिर, महादेव मंदिर इत्यादी पवित्र स्थळे आहेत.[१५]



तसेच जवळच असलेल्या कुलाबा (अलीबाग) किल्ल्यात भव्य असे गणेश मंदिर आहे. या मंदिरात गणेश मूर्तीबरोबरच सूर्य, शंकर, विष्णू व पार्वती या देवतांच्या मूर्त्या असल्याने या समूह मंदिरास गणेशपंचायतन मंदिर असे संबोधण्यात येते. सुंदर नक्षीकामाने युक्त

असलेल्या या मंदिराच्या उजव्या अंगास शिवमंदिर आणि डाव्या अंगास हनुमान मंदिर आहे. समोर एक भव्य चिरेबंदी बांधकामातील पुष्करणी आहे.[१६]

तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात विजयदुर्गपासून १६ कि.मी. अंतरावर देवगड हा जलदुर्ग आहे. या गडाजवळ कुणकेश्वर गावात श्रीकुणकेश्वराचे मंदिर आहे. हे मंदिर यादवांच्या काळात बांधले असले तरी जीर्णोद्धार मात्र छत्रपती शिवरायांनी करवून घेतला आहे. याच मंदिराच्या उत्तरेस श्री जोगेश्वरीचे लहानसे मंदिर आहे. समोर दोन दीपमाळा, एक तुळशीवृंदावन आहे. एक चबुतऱ्यावर नदी असून त्याच्या मागे लहानसे शिवमंदिरही पहावयास मिळते.[१७]

### *सिंधुदुर्ग :*

शिवकालीन जलदुर्गांचा मानबिंदू म्हणून सिंधुदुर्गाकडे पाहिले जाते. गडाच्या प्रवेशद्वारातच हनुमान मंदिर आहे. गडात जरीमरी मंदिर, महादेव मंदिर आपल्याला पहावयास मिळतात. महत्त्वाचे म्हणजे राजाराम महाराजांनी बांधलेले शिवराजेश्वर मंदिर होय. शिवरायांचे नावाड्याच्या वेशात दाढी नसलेली ही मूर्ती मंदिरात दिसते. तेथे असलेली तलवार ही शिवरायांची किंवा राजाराम महाराजांची असल्याचे सांगितले जाते. येथे आजही नित्याने पुजा-अर्चा चालू असते. गडावर भगवती देवीचे मंदिरही आहे.[१८]

थोडक्यात गिरीदुर्ग, भुईकोट, जलदुर्ग किंवा पायथ्याशी असलेल्या गावांमध्ये असलेली मंदिरे आणि धार्मिक स्थळे पहाता शिवकालीन राज्यकर्त आणि समाज हा श्रद्धावान असल्याचे लक्षात येते. प्रत्येक गडकोट व वास्तुंवर मंदिराची बांधणी, मूर्त्यांची प्रतिष्ठापना, जीर्णोद्धार करून मराठा राज्यकर्त्यांनी देव-देवतांवरील श्रद्धा व्यत केल्याचे दिसून येते. ही श्रद्धास्थाने आपल्याला यश मिळवून देतात, राज्याला भरभराट आणि संपन्नता प्राप्त करून देतात. त्यांच्यावरील श्रद्धेने आत्मबळ वाढून एक नवी दिशा मिळत असते अशी भावना असल्याने राज्यकर्ते अशा धार्मिक स्थळांची मनोभावे पूजा अर्चा करीत. त्या ठिकाणी दिवाबत्तीची व्यवस्था करीत असा प्रत्यय येतो.

### *संदर्भ :*

१) गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने, मराठेकालीन संस्था व विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९०, पृ. ५४ ते ५६.
२)पवार डॉ. जयसिंगराव, शिवाजी आणि शिवकाल, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जुलै २००१, पृ. २५.
३)गायकवाड डॉ. लहू, विद्यासागर डॉ अमोल, शिवनेरी किल्ल्याचा इतिहास, पुष्पानंद प्रकाशन, पुणे २०११, पृ. १-२.
४)घाणेकर, पृ. २३३
५)भोसले प्रविण, वनदुर्ग प्रतापगड, दुर्गदर्शन पुस्तक क्र. ७, नरसिंह पब्लिकेशन्स, सांगली, पृ. १२.
६)पिंपळे पराग, साद सागराची, बुकमार्क पब्लिकेशन्स, पुणे २००४, पृ. १८
७)प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दि. १२ मे २००९.
८)घाणेकर प्र. के. उपरोक्त, पृ. ११३.
९)तत्रैव, पृ. १६२-१६३.
१०)तत्रैव, पृ. ९०-९४.
११)प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दि. १३ मे २००९.
१२)प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दि. ३ जून २००८.
१३)प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दि. ४ ऑक्टोबर, २०१५
१४)प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दि. १० मे २००९
१५)प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दि. १० मे २००९.
१६)घाणेकर, उपरोक्त, पृ. १२३-१२४
१७)भोसले प्रविण, शिवलंका सिंधुदुर्ग, नरसिंह पब्लिकेशन्स, सांगली, २०१०, पृ. २६



***अनिल माणिकराव बैसाणे***
इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects


Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.in